# महात्मा जोतीराव गोविंदराव फुले : राजकीय विचार

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## 1. प्रस्तावना

महात्मा फुले यांच्या कार्यामागील प्रेरणा उदात्त, मूलग्राही आणि व्यापक होती ते प्रत्येक वेळी शोषितांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले होते. ते धर्म भेद भाव करीत नव्हते. फुल्यांच्या मनात शोषितांबदल खोल सहानुभूती होती. त्यांच्या सुख दुखाशी ते तादात्म्य पावलेले होते. श्रमिक शुद्राति शुद्रातील सुप्त शक्तीची त्यांना पुरे पूर ओळख पटली होती. नव निर्माण क्षमतेवर त्यांचा विश्वास होता. सामाजिक न्याय व समता यांच्या स्थापनेसाठी ही शक्ती जागृत करण्याची आवश्यकता त्यांना तीव्रपणे जाणवत होती ते जन्मभर प्रयत्नशील होते. म्हणून “सामाजिक क्रांतीचे उद्गते अग्रदूत” हा त्यांचा गोरव सथोचित आहे.

## 2. चरित्र

जोतीरावाचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली एका मध्यम वर्गीय शेतकरी कुटुंबात पुणे येथे झाला. त्यांचे मूळ आडनाव गोऱ्हे आणि मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुन नांवाचे खेडे होते. पण त्यांचे आजोबा पुण्यात स्थाईक झाले होते. पेशव्यांना फुले पुरविण्याचा व्यवसाय घरात चालत असल्यामुळे त्यांना फुले नावाने लोक ओळखू लागले. जोतीराव एक वर्षाचे होण्यापूर्वीच त्यांच्या आईचे निधन झाले सगुण क्षीरसागर नामक विधवेने त्यांना आईची माया दिली त्यांचे वडील गोविंदराव यांनी त्यांना वयाचा सातव्या वर्षी मराठी शाळेत घातले. परंतु अभ्यासक्रम पुरा होण्यापूर्वीच त्यांच्या शिक्षणात खंड पडला. शिक्षण सोडून त्यानां आपल्या घरच्या बागेत बाग काम करावे लागले परंतु त्यांची बुद्धीमत्ता पाहून त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या एका उर्दू शिक्षकांनी व इग्रज ग्रहस्थानी जोतीरावाना पुन्हा शाळेत घालावे असा आग्रह गोविंदरावनां केला त्यांना ते पटले त्यानी आपल्यामुलाला इग्रजी शिक्षणासाठी स्कॉटिश मिशनच्या शाळेत घातले ही जोतीरावाचा जीवनातील महत्वाची घटना होती.

जोतीरवांकडे कुशाग्र बुद्धीमता आणि चिकित्सक कृती होती. विद्यार्थी दशेतच ते धार्मिक, सामाजिक प्रश्नांचा अभ्यास आणि चिंतन करू लागले जोतीरावानी सन १८४७ साली सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश केला शालेय शिक्षण पूर्ण केल्या नंतर नोकरी मिळवण्याचा प्रयत्न न करता त्यांनी समाज कार्याला स्वतःला वाहून घेतले.

१८४८ मध्ये सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. नंतर त्यांनी केलेले पहिले कार्य म्हणजे पुण्यामध्ये दलितांच्या मुलीसाठी त्यांनी शाळा काढली. अशा शाळेत शिकविण्यासाठी शिक्षक मिळणे ही दुरापास्त होते म्हणून जोतीरावानी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना स्वतः शिक्षण दिले व त्या मुलींच्या शाळेच्या शिक्षिका बनल्या.

**3. राजकीय सत्ता विषयक दृष्टीकोन**

समाजातील दीनदुबळ्या लोकांची दैन्यावस्थ कशी दूर करता येईल हा एकच प्रश्न जोतीरावाचा मनात कायम होता. हे उदिष्ट साध्य करण्यासाठी त्यानी लोक शिक्षणाचा मार्ग स्वीकारला पण त्यांचा बरोबर राजकीय सत्ता हे समाज परीवर्तनाचे महत्वाचे साधन आहे याची त्यांना जाणीव होती.

शुद्रातिशूद्रांचे सामाजिक दास्य नाहीसे होऊन त्यांना राजकीय अधिकार पदे मिळाली तसेच समाजात त्यांना समान दर्जा प्राप्त होईल अशी धारणा त्यांची होती. यासाठी शासनानी पुढाकार घेतला पाहिजे असा त्याचा आग्रह होता. तसेच शुद्रातिशूद्रांनी आपली उदासीनता आणि न्यूनगंड सोडून शासनाच्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला पाहिजे.

ब्रिटीश राजवट ही उदारमतवादी आणि न्यायप्रिय असल्याने कष्टकरी जनतेला आपली प्रगती साध्य करण्याची संधी आहे असे त्यांना वाटत होते.

इंग्रजी राजवटी कष्टकरी जनतेला न्याय मिळेल असे जोतीरावाना वाटत होते. परंतु हे राज्य निर्माण होण्यापूर्वी भारतातील जुन्या राजवटीचा कारभार अंदाधुंदीचा होता. त्याच्या मनमानी कारभाराला विटले होते. शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. राज्यकर्ते मात्र यज्ञयाग ब्राम्हण भोजने तीर्थयात्रा यात गढून गेले होते. प्रजेची लुटमार चालू होती या परिस्थितीत इंग्रजी राज्य आले हे लोकांना दैवी वरदान वाटले.

लोकहितवादी न्या रानडे, तेलंग इ. विचारवंताप्रमाणेच मा. जोतीराव फुले यांचा न्यायनिष्ठेवर आणि उदारमतवादावर विश्वास होता शुद्रातिशूद्रांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी ईश्वरी योजनेने इंग्लंड आणि भारत यांचा संबंध जुळून आला आहे. अशी त्यांची धारणा होती तरी देखील इंग्रजांच्या प्रत्यक्ष राज्यकारभारात कष्टकरी जनतेवर अन्याय होतांना दिसला तेव्हा सडेतोड शब्दात ते आपले मत व्यक्त करीत असत

सामाजिक क्षेत्रात उच्च जातीची मक्तेदारी आहे ती नाहीशी झाली पाहिजे इतर जातींना त्यात जागा मिळाल्या पाहिजेत बहुजन समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे यामुळे योग्य ते तरुण पुढे येऊन जबाबदाऱ्या पार पडू शकतील या साठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत असा जोतीरावाचा आग्रह होता

सामाजिक सुधारणे बाबत तटस्थ वृतीवर जोतीरावाचा आक्षेप होता. ब्रिटीश

राज्यकर्त्यांनी प्रारंभीच्या काळात समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी काही कायदे केले होते सन. १८५७ च्या उठवानंतर ते या बाबत साधन बनले धार्मिक, सामाजिक क्षेत्रात आपण फार हस्तक्षेप केले तर लोकात असंतोष निर्माण होईल, या भीतीने त्याबाबत त्यांनी तटस्थेचे धोरण स्वीकारले, परंतु सामाजिक सुधारणांबाबत सरकारने उदासीन राहणे म्हणजे हिंदू धर्म परंपरेने निर्माण केलेली विषमता आणि अन्याय तसाच चालू ठेवण्यास मदत करण्यासारखे आहे असे जोतीरावांचे मत होते.

स.न. १८७७ च्या सुमारास महाराष्ट्र राजकीय चळवळीला सुरुवात झालेली होती या कालावधीत दोन पंथांचे विचारवंत होते काही विचारवंत राजकीय सुधारणांच आग्रह धरणारे होते.

राजकीय विचारवंतांच्या मते समाजाची जी अधोगती झाली ती पारतंत्रामुळे झालेली आहे जर आपल्याला देशाचा विकास उन्नती घडून आणावयची असेल तर राजकीय हक्क प्राप्तः करून घेण्याबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे तसेच आपल्या देशाबद्लचा स्वाभिमान जागृत केला पाहिजे. यासाठी धर्म, परंपरा, इतिहास, संस्कृती या बदलचा लोकांचा अभिमान जागृत करण्याच्या कार्यावर विचारवंतानी भर दिला.

सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणाऱ्या विचारवंताच्या मते सामाजिक अधोगतीला परकीय सत्ता कारणीभूत नसून आपल्या समाजातील अनिष्ट रूढी आणि परंपरा कारणीभूत आहेत सरकारकडे राजकीय हक्काच्या मागणी करण्यापूर्वी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा दूर केल्या पाहिजेत तसेच समाजात आधुनिक शिक्षण व ज्ञानविज्ञानाचा मोठ्याप्रमाणात प्रसार केला पाहिजे तसेच समाज राजकीय हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ बनेल म्हणून व्यक्ती स्वतंत्र ,समानता सामाजिक न्याय, बुद्धीनिष्टता या आधुनिक सरणीचा अंगीकार समाजाने प्रथम केला पाहिजे असे मत सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणाऱ्या विचारवंतांचा होते.

महात्मा जोतीराव फुले हे सुद्ध सामाजिक सुधारणा प्रथम झाल्या पाहिजे ह्या मतांशी सहमत होते ब्रिटीश सरकारने हिंदी लोकांना राजकीय अधिकार दिले तर त्यांचा फायदा अशिक्षित आणि शुद्रातिनीशूद्रांनां मिळणार नाही कारण त्यांचा खरा फायदा शिक्षणात पुढे असणाऱ्या ब्राम्हण आणि तत्सम वर्गालाच मिळेल त्यामुळे हे लोक आपल्या आधिकाराचा वापर ते समाज जीवनावरील आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी करतील असे जोतीरावाना वाटत होते म्हणून सरकारच्या मदतीनीने सर्व प्रथेम खेड्यापाड्यात शिक्षणाचा प्रसार करावा व आपले अधिकार उपभोगण्याची पात्रता शुद्रातिशूद्रांमध्ये निर्माण करावी असा जोतीरावाचा आग्रह होता.

महत्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ सर्वांगीण स्वरूपाची होती त्यांनी धार्मिक, सामाजिक प्रश्न आणि कष्टकरी जनतेच्या आर्थिक प्रश्नांचा विचार ही चळवळी मध्ये केला होता “शेतकऱ्यांचा आसूड” या आपल्या ग्रंथात त्यानी

शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, त्यांचावर होणाऱ्या अन्यायांचे ही वर्णन केले आहे तसेच दारिद्र्य दूर करण्याचे उपाय ही सुचवले आहे.

खेडे गांवातील शेतकरी आणि कारागीर यांच्या दारिद्र्याची मिमांसा करतांना ते म्हणतात पूर्वी खेडे गावात लोहार, सुतार, कोष्टी, साळी इ. कारागीर आणि त्यांचा हाताखाली काम करणाऱ्या लोक, पोटापुरते उत्पन्न मिळवीत असत व आपला चरितार्थ चालवीत असत, पण आता इंग्लंड मधील कारखान्यात तयार झालेल्या वस्तू भारतात येऊ लागल्या त्यांचा खप वाढला आणि देशी कारागिरांचे व्यवसाय बुडत आहे. याच बरोबर सतत वाढत असलेल्या लोक्संख्याचे भार शेतीवर पडत आहे. वाढत्या लोकसंखेनुसार शेत जमिनीच्या वाटण्या होत जातात. प्रत्येकाच्य वाटयाल थोडी जमीन येते उत्पन कमी होते. उत्पन कमी झाले तरी सरकारी शेतसाऱ्याचे दर मात्र तेच कायम असतात अशा परिस्थितीमुळे शेतकरी दरिद्री बनत चालला आहे.

जोतीरावानी शेतकऱ्याच्या अन्यायाला सरकारी नोकरशाही, सावकार यांना जबाबदार धरले. त्याकाळात सरकारी अमंलदार, सावकार, वकील, न्यायाधीश, फौजदार हे सर्व वरिष्ठ वर्गातील असत. या वर्गाला शेतकऱ्या बद्दल सहानुभूती नव्हती. सरकारी नोकरशाही व कष्ट करणारा शेतकरी यांच्यात दुरावा निर्माण झाला होता. शेतकऱ्याच्या प्रश्नांना न्याय मिळत नसे. सावकाराच्या मनात सहानुभूती नव्हती. नोकरशाही वर्ग शेतकऱ्याचे शोषण करीत असे इ. बाबद अत्यंत प्रत्ययकारी वर्णन जोतीराव नी “शेतकऱ्याचा आसूड” मध्ये केले आहे.

**4. समारोप**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी जे उपाय सुचविले होते ते आजच्या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेशी जुळणारे आहेत. समाजातील आर्थिक विषमता कमी करणे प्रत्येक व्यक्तीला किमान प्राथमिक गरजा भागतील एवढे उत्पन्नाचे साधन प्राप्त करून देणे हे कल्याणकारी राज्याचे उद्धिष्ट असते आशीच कल्पना फुले यांनी आपल्या आर्थिक विचारा मध्ये मांडलेली आहे.

शेती, पशुपालन शेतकऱ्याचे उत्पनाचे साधन आहे. त्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेती व पशुपालन यात सुधारणा करावी त्यासाठी पाणीपुरवठा वाढविणे, चांगल्या जनावराची पेदास करणे, शेतावरील करांचा बोजा कमी करणे इ. उपाय सुचविले.

जोतीरावानी शेतकऱ्याचे प्रश्न आत्मीयतेने समजून घेऊन सरकारी अधिकारी प्रांतिक गव्हर्नर पर्यंत स्पष्ट शब्दात मांडण्याची तत्परता आणि धर्य दाखविले या मध्येच त्यांचे मोठेपण आणि लोकाभिमुख वृती दिसून येते. जोतीराव हे शेतकऱ्याची गार्हाणी सडेतोड पणे समाजासमोर मांडणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत होते.

**संदर्भ पुस्तके**


१. २१ व्या शतकाच्या विकासासाठी शिक्षण, लेखक – प्रा.ए. एस गोल्हार, प्रा. के डी. शिंदे
प्रकाशन- श्री प्रकाशन पुणे

२. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, लेखक – डॉ. वा. भा. पाटील
प्रकाशन- प्रशांत पाब्लीकेशन, जळगाव

३. शाहूंच्या आठवणी, लेखक प्रा. नानासाहेब साळुंखे
प्रकाशन- वृषाली प्रकाशन, कोल्हापूर